**<u>प्रेसनोट</u>** दि. २७/०६/२०२५

## अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून उपनिबंधक सहकारी संस्था, दापोडी, पुणे कार्यालयातील उपनिबंधक व सहकारी अधिकारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दापोडी पोलीस स्टेशन, पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तलाय, पुणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती संगीता सुभद्रा बाबुराव किरवले-चौधरी, वय- ५० वर्षे, पद - सहकारी अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, दापोडी, पुणे. (वर्ग-३)<br>२) श्री.मुकुंद विमल भास्कर पवार, पद-उपनिबंधक, सहकारी संस्था,दापोडी, पुणे.(वर्ग १) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,७००/- (तीन हजार सातशे) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३,७००/- (तीन हजार सातशे) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,७००/- (तीन हजार सातशे) रुपये |
| पडताळणी दिनांक | २६/०६/२०२५ |
| सापळा दिनांक | २७/०६/२०२५ |
| ठिकाण | उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयात, दापोडी, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती. निता मिसाळ, पोलीस उप अधीक्षक , लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८२२२१४४१४) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या नवीन सोसायटीचे रजिस्ट्रेशन नोंदणी करण्याचा प्रस्ताव सर्व सभासदांनी मिळून तयार करून दिनांक २५/३/२०२५ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था, दापोडी, पुणे या कार्यालयातील लोकसेवक क्र. १. श्रीमती संगीता किरवले-चौधरी, सहकारी अधिकारी यांच्याकडे दिला होता. त्यावेळी लोकसेवक श्रीमती किरवले-चौधरी यांनी तक्रारदार यांच्याकडे सोसायटीच्या एका सभासदासाठी ७०० रुपये प्रमाणे १६ सभासदाचे ११,२०० रुपयाची लाच मागणी करुन, त्या रकमेपैकी ७५०० रुपये तक्रारदार यांचेकडून अगोदरच घेऊन तक्रारदाराच्या सोसायटीचे नोंदणी प्रमाणपत्र तक्रारदारास दिले होते. परंतु त्यांनी मागितलेली संपूर्ण लाच रक्कम तक्रारदाराकडून मिळाली नसल्याने तक्रारदाराच्या सोसायटीचे बाय लॉज (उपविधी) बुकलेट तक्रारदाराला दिले नव्हते. ज्यावेळी तक्रारदार ते बायलॉज (उपविधी) बुकलेट घेण्यासाठी लोकसेवक क्र.१ - श्रीमती सुभद्रा किरवले-चौधरी यांच्याकडे गेले असता, त्यांनी ते बायलॉज (उपविधी) बुकलेट देण्यासाठी उर्वरित ३७०० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदाराने दि. २६/६/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २६/०६/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक श्रीमती. सुभद्रा किरवले - चौधरी, सहकारी अधिकारी यांनी तक्रारदाराकडे त्यांचे सोसायटीचे रजिस्ट्रेशन नोंदणी करुन त्याचे बायलॉज बुकलेट देणेकरता सुरुवातीस ११,२०० रुपये लाच मागणी करुन, त्यातील अगोदरच तक्रारदाराकडून घेतलेले ७५०० रुपये वजा करून उर्वरित रक्कम ३७०० रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक क्र. २ - श्री. मुकुंद पवार, उपनिबंधक यांनी लोकसेवक क्र १ श्रीमती. सुभद्रा किरवले – चौधरी यांनी तक्रारदाराकडे केलेल्या लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. २७/०६/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक श्रीमती. सुभद्रा किरवले-चौधरी, सहकारी अधिकारी यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी स्वतःच्या उपनिबंधक सहकारी संस्था, दापोडी कार्यालयात तक्रारदाराकडून ३,७०० रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, लोकसेवक क्र. १ व क्र. २ यांचेविरुद्ध दापोडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.